**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८**

**ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३**

**कार्यपत्रिका क्र. ६**

**सभावृत्तांत**

दिनांक :- २/०३/२०२१ वेळ :- सकाळी ११.३० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा मंगळवार दिनांक २/०३/२०२१ रोजी सकाळी ११.३० वा. ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

१. मा.सुरेश शिवाजी भोईर - अध्यक्ष
२. मा.प्रज्ञा महेश खानोलकर
३. मा. नामदेव जनार्दन ढाके
४. मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई
५. मा.करुणा शेखर चिंचवडे
६. मा.अपर्णा निलेश डोके
७. मा.अश्विनी गजानन चिंचवडे
८. मा.राजेंद्र तानाजी गावडे
९. मा.बिभीषण बाबु चौधरी
१०. मा.विठ्ठल बबन भोईर

याशिवाय क्षेत्रीय अधिकारी श्रीमती सोनम देशमुख, श्री.प्रशांत पाटील – कार्यकारी अभियंता,स्थापत्य, श्री.चंद्रशेखर धानोरकर – उपअभियंता,स्थापत्य, श्री.उमेश मोने – कनिष्ठ अभियंता, श्री.करपे डी आर – उपअभियंता , बांधकाम परवानगी, श्रीमती मोमीन झेड आय – उपअभियंता, झोनिपु स्थापत्य,अमोल कानडे – कनिष्ठ अभियंता, पाणीपुरवठा, श्री.पारोल के.बी- मुख्य आरोग्य निरीक्षक, श्री.नितीन देशमुख – कार्यकारी अभियंता, विद्युत, श्री.अकबर शेख- उपअभियंता, विद्युत इत्यादी उपस्थित होते

----------

**मा. सभापती**– सर्व सन्मा सदस्य व अधिकारी/कर्मचारी यांचे स्वागत करुन सभेस सुरुवात करणेत येत आहे.

१) दिनांक १२/०२/२०२१ रोजीचा (विशेष सभेचा) सभावृत्तांत कायम करणेत आला.

२) दिनांक १२/०२/२०२१ रोजीचा (कार्यपत्रिका क्रमांक ५) सभावृत्तांत कायम करणेत आला

वरील प्रमाणे सभेचे कामकाज झाले मा. सभापती यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर केले.

[सुरेश शिवाजी भोईर]
सभापती
ब प्रभाग समिती, चिंचवड

पिंपरी चिंचव महानगरपालिका,
ब प्रभाग कार्यालय, चिंचवड ३३
जा. क्र. बक्षे/सभाशाखा/२/कावि/७६/२०२१.
दिनांक : १६/०३/२०२१

प्रशासन अधिकारी
तथा
सचिव( सभाशाखा )
ब प्रभाग समिती

प्रत -सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

ब क्षेत्रिय कार्यालय ,चिंचवड

क्र.बक्षेका/ २ /   /२०२१

दिनांक - १६/०३/२०२१

प्रति,

सर्व विभागप्रमुख,
ब क्षेत्रिय कार्यालय,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

**विषय - मा.ब प्रभाग मासिक सभेमध्ये झालेल्या विषयांवर योग्य ती कार्यवाही करणेबाबत..**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २९ अ नुसार प्रभाग समितीची स्थापना करण्यात आली असुन सदरच्या समिती या कायद्याने गठीत केलेल्या आहेत. प्रभाग समितीत होणा-या कामकाजाबाबत कार्यवाही करणे हे संबंधित क्षेत्रिय कार्यालयाची जबाबदारी आहे.

ब क्षेत्रिय कार्यालय प्रभाग समिती मासिक सभा प्रत्येक महिन्याच्या पहिल्या मंगळवारी सकाळी ११.३० वाजता घेण्यात येते, या सभेत सर्व संबंधित शाखाप्रमुख यांनी उपस्थित राहणे बंधनकारक आहे. तथापि सदर सभेस काही विभागांचे शाखाप्रमुख उपस्थित राहत नसलेबाबत सन्माननीय सदस्य यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.  तसेच सदर बाब मा.आयुक्त यांचे निदर्शनास आणुन देण्यात यावी, असे मा.नगरसदस्यांनी सांगितले आहे.

माननीय सदस्य यांनी आपले विभागाशी उपस्थित केलेल्या प्रश्नांवर अभ्यासपुर्वक माहिती समिती सभेत देणेत यावी तसेच प्रभाग समितीत झालेल्या सभावृत्तांतातील ठरावांवर नियमाधीन कार्यवाही करणेत यावी.  याबाबत क्षेत्रिय कार्यालयाकडुन कोणताही वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही.  याची स्पष्ट नोंद घ्यावी.  दिनांक २/०३/२०२१ रोजी झालेल्या मासिक सभेमध्ये नगरसदस्यांनी खालीलप्रमाणे आपल्या समस्या मांडल्या, त्यावर लवकरात लवकर योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा उचित अहवाल उलट टपाली प्रशासन विभाग, ब क्षेत्रिय कार्यालय येथे पाठविणेत यावा.

| **अ.क्र.** | **मा.नगरसदस्य** | **उपस्थितीत केलेले प्रश्न** | **संबंधित विभाग** |
|---|---|---|---|
| १ | मा.माधुरी | १) मनिषा विरंगुळा केंद्राची भिंत तोडली आहे. | स्थापत्य |

| | | | |
|---|---|---|---|
| | कुलकर्णी ऊर्फ मोनाताई (प्रभाग क्र.१७-ब) | ती लवकरात लवकर बांधुन घ्यावी.<br>२) दळवीनगर येथील जुने झालेले फ्लेक्स काढणेत यावे. | |
| २ | मा.विठ्ठल भोईर (स्वीकृत सदस्य) | १) दर्शननगरी समोरील फुटपाथ वरील अतिक्रमण काढणेत यावे. | अतिक्रमण |
| ३ | मा.बिभीषण चौधरी (स्वीकृत सदस्य) | १) प्रभागामध्ये जागोजागी असलेले जुने झालेले मोठमोठे फ्लेक्स व स्टीकर्स काढणेत यावे. मोठया होर्डींग्जसाठी नियमावली लावणेत यावी. | अतिक्रमण |
| ४ | मा.राजेंद्र गावडे (प्रभाग क्र.१८-ड) | १) आरटीओ ऑफिस साठी जागा देण्यात आली होती,तिकडे वडापाव ची गाडी लागलेली आहे. अतिक्रमणात असलेले बोर्ड उचलुन न्या. | अतिक्रमण |
| ५ | मा.सुरेश भोईर (अध्यक्ष(प्रभाग क्र.१८ अ) | १) अतिक्रमण विभागाने फ्लेक्स संदर्भात लवकरात लवकर कार्यवाही करावी.<br>२) शिवाजी उदय मंडळ येथील वायर्स, डीपी बॉक्स बदलुन देण्यात यावा.<br>३) ब्लॉक्स लावणेत यावे. | अतिक्रमण<br>विद्युत<br>स्थापत्य |

क्षेत्रिय अधिकारी तथा सहा .

आयुक्त

ब क्षेत्रिय कार्यालय पिं.चि.मनपा

चिंचवड पुणे ३३